# २८ हजार ७८९ विद्यार्थी देणार ऑनलाईन परीक्षा

## अंतिम वर्ष परीक्षा; ऑनलाईन भरलेल्या माहितीद्वारे स्पष्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतिम वर्ष शेवटचे सत्र परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून त्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये अपडेट करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार शुक्रवारपर्यंत सुमारे २८ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाकडून अंतिम वर्ष शेवटचे सत्र, बॅकलॉगच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यासाठी तयारी वेगाने सुरू आहे. सर्व नियमित अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ऑक्टोबर व बॅकलॉगच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. अंतिम वर्षाचे शेवट सत्र व बॅकलॉग मिळवून ५८० हून अधिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७० हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

परीक्षार्थीला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणकप्रणालीत अपडेट करण्याचे आवाहन केले होते. दि. २५ सप्टेंबरपर्यंत ३२ हजार ५८३ विद्यार्थ्यांनी परीक्षेचा पर्याय निवडीची माहिती भरली आहे. यात २८ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ३ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. आणखी ५० टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षेचा पर्याय निवडलेला नसल्याचे ऑनलाईन माहितीमधून पुढे आले आहे.

> कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मोबाईल नंबर व ई-मेल अपडेट करावे. तसेच, विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंकवर जाऊन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

## शिवाजी विद्यापीठ : एकूण २५ उमेदवार; मुलाखती ऑनलाईन घेणार

# कुलगुरुपदासाठी आज १५ जणांच्या मुलाखती

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेंतर्गत २५ उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया आज, शनिवारपासून दोन दिवस चालणार आहे. पहिल्या दिवशी १५ जणांना वेळ दिली आहे. त्यात माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. जे. फुलारी (शिवाजी विद्यापीठ पदार्थविज्ञान विभाग), प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे (डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली), प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ (श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव), आदींचा समावेश आहे.

कुलगुरुपदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. अर्जांच्या छाननीनंतर कुलगुरु शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २५ जणांची नावे निश्चित केली. या उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती ही समिती घेणार आहे. शनिवारी सकाळी १०.३० पासून मुलाखती सुरु होतील. मुलाखतींसाठी समितीने १५ उमेदवारांना वेळ दिली आहे. त्यात डॉ. पी. पी. माहुलीकर (जळगाव विद्यापीठाचे प्र-कुलगुरु), डॉ. के. सी. देशमुख, प्रदीप कुंडल (नागपूर), जी. एन. शिंदे, एल. एम. वाघमारे, दीपक पानस्कर (नांदेड), एम.

### कार्यक्षेत्रनिहाय उमेदवार

- शिवाजी, नागपूर, नांदेड विद्यापीठ- प्रत्येकी ४
- औरंगाबाद विद्यापीठ- ३
- पुणे विद्यापीठ- २
- जळगाव आणि भारती विद्यापीठ- प्रत्येकी १
- अन्य शैक्षणिक संस्था- ६

बी. मुळ्ये, डब्ल्यू. के. सरवदे, एम. व्ही. काळे (बीएएमयू, औरंगाबाद), दिलीप पानगव्हाणे (नाशिक), आर. एस. अवस्थी (लातूर) यांचा समावेश आहे. उर्वरित १० उमेदवारांच्या उद्या, रविवारी मुलाखती होतील. त्यामध्ये डॉ. गीता लाटकर (एमजीएम, नांदेड), आनंद भालेराव (भारती विद्यापीठ, पुणे), विनायक देशपांडे (माजी प्र-कुलगुरु, नागपूर), मिलिंद उमेकर (भोईर कॉलेज, नागपूर), अनुभा खळे (एसएनडीटी, मुंबई), अविनाश कुंभार, अंजली कुरणे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), आदींचा समावेश आहे. प्रत्येक उमेदवाराला एक तासाचा वेळ दिला आहे. त्यात त्यांना विद्यापीठाचे व्हिजन, स्वत:ची वाटचाल, आदींबाबतचे सादरीकरण करावयाचे आहे. या उमेदवारांमधून अंतिम मुलाखतीसाठी पाचजणांची निवड समितीकडून करण्यात येणार आहे.

निवड प्रक्रियेतील २५ जणांचा शॉर्टलिस्ट उमेदवारांत यापूर्वी अन्य विद्यापीठांसाठी अनेकदा शॉर्टलिस्ट झालेल्यांचा समावेश आहे. त्यात डॉ. काळे (१० वेळा शॉर्टलिस्ट), कुंडल (नऊवेळा), शिंदे (आठवेळा), देशमुख (सातवेळा), सरवदे (सहावेळा), देशपांडे व भालेराव (पाचवेळा) यांचा समावेश आहे. यांतील काही टॉप फाईव्हमध्येही पोहोचले होते.

# कुलगुरू निवडीची उत्सुकता

## आज, उद्या दोन टप्प्यांत मुलाखती

**कोल्हापूर, ता. २५ :** कुलगुरू पदासाठी उद्या (ता. २६) व रविवारी (ता. २७) मुलाखती होत आहेत. दोन टप्प्यांत मुलाखत प्रक्रिया होत असून, कुलगुरूपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याची उत्सुकता ताणली गेली आहे.



उद्या होणाऱ्या मुलाखतीत माजी प्रशासकीय अधिकारी व प्राध्यापकांचा समावेश आहे. माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, पी. पी. माहुलीकर, डॉ. के. सी. देशमुख, प्रदीप कुंडल, जी. एन. शिंदे, एल. एम. वाघमारे, दीपक पानस्कर, एम. बी. मुळ्ये, डब्ल्यू. के. सरवदे, एम. व्ही. काळे, तर रविवारी आनंद भालेराव, विनायक देशपांडे, मिलिंद उमेकर, अनुभा खळे, अविनाश कुंभार, अंजली कुरणे मुलाखतीस सामोरे जातील.



**शिवाजी विद्यापीठातून...**

# कुलगुरूपदासाठी आजपासून दोन दिवस मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरूपदाच्या निवड प्रक्रियेअंतर्गत शनिवार (दि. २६) पासून दोन दिवस शोध समितीकडून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पात्र २५ उमदेवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत.

कुलगुरूपदाच्या निवडीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. कुलपती कार्यालयाकडून कुलगुरू निवड प्रक्रियेअंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमली आहे. इच्छुक उमदेवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविले होते. त्यानुसार १६९ अर्ज प्राप्त झाले. शोध समितीने अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली. २६ व २७ सप्टेंबर रोजी शोध समितीकडून पात्र उमेदवारांच्या मुलाखती होतील. उमेदवारांना एक तासात त्यांची स्वत:ची वाटचाल, शिवाजी विद्यापीठाबद्दलचे व्हीजन, विकास आराखडा याचे शोध समितीसमोर सादरीकरण करावे लागणार आहे. त्यामधून पात्र उमेदवारांची नावे निश्चित करून कुलपती कार्यालयास सादर केली जातील. राज्यपालांसमोर त्या उमेदवारांचे सादरीकरण होऊन स्वतंत्र मुलाखती होतील. राज्यपाल यांच्याकडून त्यामधील एकाची कुलगुरूपदी निवड केली जाईल.

# २८ हजार विद्यार्थी देणार 'ऑनलाईन' परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखांच्या अंतिम वर्ष, सत्राच्या २८ हजार ७८१ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी शुक्रवारपर्यंत ऑनलाईन, तर ३७९४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पर्यायाची निवड केली आहे. अजून ५० टक्के विद्यार्थ्यांनी पर्यायांची माहिती दिलेली नाही.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या पर्यायाची निवड करण्यासाठी गेल्या आठवड्यापासून ऑनलाईन सर्वेक्षण सुरू केले आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील अंतिम वर्ष, सत्राची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ६० हजार आहे. त्यांपैकी ३२५८३ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी निवडलेल्या पर्यायाची माहिती या सर्वेक्षणाअंतर्गत दिली आहे. दि. १० ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याचे नियोजन करण्यासाठी या सर्वेक्षणाची मदत होणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्याबाबतच्या पर्यायांची माहिती दिलेली नाही, त्यांनी लवकरात लवकर ही माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन फॉर्मच्या माध्यमातून द्यावी, असे आवाहन गजानन पळसे यांनी केले.ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी ओएमआर शीटचा वापर करण्याचा विचार आहे.

# २८ हजार विद्यार्थी देणार 'ऑनलाईन' परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखांच्या अंतिम वर्ष, सत्राच्या २८ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी शुक्रवारपर्यंत ऑनलाईन, तर ३७९४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पर्यायाची निवड केली आहे. अजून ५० टक्के विद्यार्थ्यांनी पर्यायांची माहिती दिलेली नाही.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या पर्यायाची निवड करण्यासाठी गेल्या आठवड्यापासून ऑनलाईन सर्वेक्षण सुरू केले आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील अंतिम वर्ष, सत्राची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ६० हजार आहे. त्यापैकी ३२५८३ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी निवडलेल्या पर्यायाची माहिती या सर्वेक्षणाअंतर्गत दिली आहे. दि. १० ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याचे नियोजन करण्यासाठी या सर्वेक्षणाची मदत होणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्याबाबतच्या पर्यायांची माहिती दिलेली नाही, त्यांनी लवकरात लवकर ही माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन फॉर्मच्या माध्यमातून द्यावी, असे आवाहन गजानन पळसे यांनी केले.ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी ओएमआर शीटचा वापर करण्याचा विचार आहे.